कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
(स्थापना विभाग)

जाहिरात क्र. ०१ /ज.स./2019 दि. 21/01/2019

थेट मुलाखत

नागपूर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील, मालकीच्या/अधिनस्त अचल मालमत्ताचे शासकीय अभिलेखात नोंद घेण्याकरीता, प्रकरणाचा पाठपुरावा करण्याकरीता तसेच महापालिका मालमत्ताचा शोध घेवून अभिलेख तयार करण्याचे दृष्टीने महाराष्ट्र शासन, महसुल सेवेतील सेवानिवृत्त तसेच किमान तहसीलदार किंवा वरीष्ठ अधिकारी या पदावरून सेवानिवृत्त झालेले अनुभवी अधिकाऱ्यांची स्थावर विभागा अंतर्गत "भूसंपादन सल्लागार" या पदावर कंत्राटी तत्वावर शासन निर्णय दि. 17 डिसेंबर, 2016 नुसार अनुज्ञेय मासिक पारिश्रमिक तत्वावर प्रथमतः 6 महिन्याच्या कालावधीकरिता नियुक्ती करावयाची आहे.

उक्त कामांचा अनुभव असलेल्या व महाराष्ट्र शासन, महसूल विभागातील किंवा इतर शासकीय सेवेतील सेवानिवृत्त तसेच किमान तहसीलदार किंवा वरीष्ठ अधिकारी या पदावरून सेवानिवृत्त झालेल्या इच्छुक उमेदवारांनी थेट मुलाखतीकरिता आवश्यक कागदपत्रांसह दि.26/01/2019 रोजी सकाळी 10 : 30 वाजता, अति. आयुक्त (II), सिव्हील लाईन्स, म.न.पा. नागपूर यांचे कार्यालय येथे उपस्थित राहावे.

अ. क्र.	पदाचे नांव	एकुण पदे	वयोमर्यादा	अनुभव.
1	भूसंपादन सल्लागार	01	कमाल 65 वर्ष	1) महाराष्ट्र शासन, महसूल विभागातील किंवा इतर शासकीय सेवेतील सेवानिवृत्त तसेच किमान तहसीलदार किंवा वरीष्ठ अधिकारी या पदावरून सेवानिवृत्त झालेल्या व या पदाचा किमान 3 वर्षाचा अनुभव. 2) सेवानिवृत्त अधिकारी शारीरिक, मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी. 3) सेवानिवृत्त अधिकारी यांच्याविरूध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

वरील उमेदवारांनी दि.25/01/2019 रोजी सकाळी 10:30 ते 12.00 पर्यंतच्या दरम्यान आपले नाव नोंद करावे. विहीत वेळेनंतर येणाऱ्या उमेदवारांच्या नावाची नोंद करण्यांत येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

अर्हता :-

1) अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
2) इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज अति.आयुक्त (II),नागपूर महानगरपालिका, सिव्हिल लाईन्स, नागपूर यांचेकडे सादर करावेत.
3) वयोमर्यादा विचारात घेतांना दि.21/01/2019 ही तारीख ग्राहय धरण्यात येईल.

4) उमेदवारांनी त्यांच्या वय, शैक्षणिक पात्रता व अनुभवाच्या सर्व कागदपत्रांच्या छायाप्रती सांक्षाकित करून जोडाव्यात.

5) उमेदवारांनी अर्ज सादर करून अर्जासोबत एक फोटो चिकटवावा व एक फोटो संलग्न करावा.

6) नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विविक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत व्यक्तीची राहील व तसे बंधपत्र/हमीपत्र त्यांच्याकडून घेण्यात येईल. तसेच सदर बंधपत्रात/हमीपत्रात करार पध्दतीने नियुक्ती देतांना शासन निर्णयांन्वये विहीत केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चित केलेल्या अतिरीक्त अटी व शर्ती, मान्य असल्याचे बंधपत्र /हमीपत्र उमेदवाराला दयावे लागेल.

7) करार पध्दतीवरील उमेदवारांना नियमित सेवैत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करता येणार नाही.

8) मासिक पारिश्रमिक – शासकीय /निमशासकीय सेवा– सेवानिवृत्त अधिका–यांची विहीत कार्यपध्दतीचे पालन करून करार पध्दतीने नेमणूक करातांना त्यांना अशा नियुक्तीच्या वेळी महागाई भत्त्यासह मिळत असलेल्या निवृत्तीवेतनाएवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्तीवेतन वगळून) त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणू निश्चित करण्यात येईल आणि एकदा निश्चित करण्यात आलेले पारिश्रमिक त्यांच्या करार पध्दतीने नियुक्तीच्या कालावधीसाठी कायम राहील.

(अभिजीत बांगर)
आयुक्त
महानगरपालिका, नागपूर

दि. / /2019

अर्जाचा नमूना

फोटो

1. पदाचे नाव :– .....

2. अर्जदाराचे नांव :– .....

3. पूर्ण पत्ता :– .....
.....
.....

मोबाईल नं. :– .....
ई–मेल आय डी :– .....

4. जन्म दिनांक :– .....

5. दि. / /2019 ला वय :– .....

6. सेवानिवृत्तीचे वेळी धारण केलेले पद व कार्यालय :– .....

7. शैक्षणिक पात्रता :– .....
.....

8. अनुभव :–

अ. क्र.	संस्थेचे नाव	धारण केलेल्या पदाचे नाव	कालावधी (पासून – पर्यन्त)	कामाचा अनुभव

स्वाक्षरी